MHST200009992020

## कि.दि.अर्ज क्र.३३/२०२३ मधील नि.क्र.२५ वरील आदेश

सदरचा अर्ज अर्जदार हिने तिचेतर्फे मुखत्यार यांचे प्रतिज्ञापत्र देणेस परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवालातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. अर्जदार हिने मुळ अर्ज हा स्पे.दि.मु.नं.९२/२०१४ मधील झालेला एकतर्फा न्यायनिर्णय रद्द होऊन मिळणेसाठी केलेला अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये मुळ अर्जदार हिची साक्ष नोंदविणेकरीता न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करण्यात आली होती. परंतु, आजरोजी मुळ अर्जदार जयमाला डिड्डी यांची शारिरीक परिस्थिती अत्यंत खराब असल्याने व त्या साक्ष देण्याच्या परिस्थितीत नसल्याने मुखत्यारामार्फत साक्ष देणेची परवानगीचा अर्ज दाखल केला आहे. सदर मुळ अर्जदार हया अत्यंत आजारी असल्याचे सामनेवाला यांच्या विद्वान विधिज्ञांनी युक्तीवादा दरम्यान मान्य केले आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार हिस मुखत्यारातर्फे पुरावा देण्याची संधी देण्यात येत आहे.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.12.08 12:40:07 +0530

स्थळ : वाई
दिनांक :०५/१२/२०२५

( ए. ए. पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वाई.